# केजच्या लिंग पिसाट शिक्षणाधिकारी बेडसकरच्या पाठीशी मोठा राजकीय हस्तक्षेप आहे का?


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं. दैनिक महाराष्ट्र

**आरंभ**

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564


**नऊ तास केज पोलीस ठाण्यात ठाण मांडलेल्या महिलेला शेवटच्या पंधरा मिनिटात गुन्हा मागे घेण्यास राजकीय दबावाने प्रवृत्त केले?**


■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २९९ ■ गुरूवार दि.१७ जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 299 ■ Thursday Dt.17 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# आ.नमिता ताई, महिला आमदार म्हणून तुमची जबाबदारी मोठी आहे, आता बेडसकर विनयभंग प्रकरणी आवाज उठवायलाच हवा, जनतेच्या अपेक्षा तुमच्यावर आहेत?

## गुन्हा मागे, दबाव पुढे, एसपी नवनीत कॉवत यांनीच आता सत्य बाहेर काढावे?

- महिलांच्या सुरक्षेच्या गळा काढणाऱ्या नेत्यांनी प्रत्यक्ष अन्यायाच्या प्रसंगी मौन बाळगल्याचे चित्र जनतेपुढे आले?
- पोलीस निरीक्षक उनवणे यांनी गुन्हा दाखल न करण्यासाठी कोणाच्या दबावाखाली काम केले, काही राजकीय नेत्यांचा हस्तक्षेप होता का?



### ९ तासांचा संघर्ष वाया! शेवटच्या १५ मिनिटांत महिलेला राजकीय दबावाने गुन्हा मागे घेण्यास भाग पाडले?

गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यावर छेडछाडीचा आरोप करणाऱ्या महिलेला न्यायासाठी थेट केज पोलिस ठाण्यात ९ तास ठाण मांडून बसावे लागले. ती गुन्हा दाखल देण्यासाठी ठामपणे होती मात्र, गुन्हा दाखल करण्याआधीच्या शेवटच्या अवघ्या १५ मिनिटांत घडलेला नाट्यमय बदल सर्वांनाच धक्का देणारा ठरला. मिळालेल्या माहितीनुसार, त्या महिलेवर राजकीय तगडा दबाव आणण्यात आला आणि संबंधित महिलेला गुन्हा मागे घेण्यासाठी मानसिक दबावाखाली आणले गेले. इतक्या वेळानेही खंबीर राहिलेली ही महिला शेवटी दबावाला बळी पडल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकारामुळे पोलीस यंत्रणा, राजकीय हस्तक्षेप आणि महिलांच्या सुरक्षेविषयी गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. गुन्हा दाखल करण्यासाठी इतका संघर्ष करणाऱ्या महिलेला अचानक मागे हटवणे ही संपूर्ण यंत्रणाच संशयाच्या भोवऱ्यात ढकलते. हा केवळ एका महिलेचा नाही, तर संपूर्ण समाजाच्या न्याय व्यवस्थेचा पराभव असल्याचे सामाजिक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे. आता या प्रकरणात कोणत्या राजकीय नेत्याचा हस्तक्षेप होता, याची चौकशी व्हावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

बीड । प्रतिनिधी

केजचे गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यावर एका महिलेसोबत छेडछाड केल्याचा गंभीर आरोप झाला आहे. सदरील महिलेने नऊ तास पोलीस ठाण्यात ठाण मांडून देखील शेवटच्या पंधरा मिनिटात प्रचंड राजकीय दबाव आणून या प्रकरणाला वेगळ्या दिशेने वळवण्याचे काम झाले आहे. सबंधित घटनेमुळे संपूर्ण शिक्षण विभागात खळबळ उडाली असून, संतापाची लाट पसरली आहे. गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर हे शिक्षण विभागातील कोट्यावधी रुपयांच्या भ्रष्टाचारात वादग्रस्त म्हणून ठरले आहेत. महिलेसोबतच्या छेडछाड प्रकरणात व शिक्षण विभागातील कोठ्यावधींच्या भ्रष्टाचार प्रकरणात भक्कम राजकीय हस्तक्षेप झाल्यामुळे त्यांना यातून सहज बाहेर काढण्यात आले असल्याची चर्चा सध्या जोर धरून आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर हे जवळपास गेल्या दहा वर्षांपासून केज तालुक्यात काम करत आहे. मूळ गाव याच तालुक्यात असल्यामुळे त्यांची राजकीय वचक जबरदस्त असल्याची चर्चा समाजात सुरू आहे. याचाच प्रत्यय महिलेच्या छेडछाड प्रकरणात आल्याचे संपूर्ण जिल्ह्याने पाहिले आहे. त्याचप्रमाणे राजकारणाचा फायदा त्यांनी शिक्षण विभागातील भ्रष्टाचार व महिलेची छेडछाड काढण्यापर्यंत केला असल्याचे बोलले जात आहे.

▶ पान २ वर

### गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर प्रकरणाला राजकीय वरदहस्ताची ढाल?

गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यावर महिलेसोबत छेडछाडीचा गंभीर आरोप एका महिलेने केला होता. पीडित महिलेने थेट पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन न्यायाची मागणी करून केज पोलीस स्टेशन गाठत तब्बल नऊ तास पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यासाठी ठाण मांडून होती. मात्र अवघ्या काही वेळातच हा गुन्हा अचानक मागे घेण्यात आल्याने या प्रकरणाला भक्कम राजकीय वरदहस्त असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. महिलेशी अन्याय होऊनही आरोपीवर कारवाई करण्याऐवजी त्याला वाचवण्यासाठी मोठ्या पातळीवर दबाव टाकण्यात आल्याचे सांगितले जात आहे. गुन्हा मागे घेण्यासाठी राजकीय हस्तक्षेप, आर्थिक तडजोड आणि दबाव यामुळे पोलीस प्रशासनही गोंधळात असल्याचे बोलले जात आहे. या प्रकरणात एकाही लोकप्रतिनिधीने उघड भूमिका घेतली नाही हे विशेष, त्यामुळे गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांना कोणी वाचवले, कोणाच्या सांगण्यावरून गुन्हा मागे घेण्यात आला, हे प्रश्न आता अधिकच गहिरे होत आहेत. या पार्श्वभूमीवर आता जनतेतून आवाज उठवला जात असून, संबंधित महिलेला न्याय मिळावा आणि दोषी अधिकारी वा राजकीय हस्तक कोण असेल त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

### पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी लक्ष घालून सत्य उघड करावे जनतेची मागणी?

या प्रकरणामागे राजकीय दबाव, आर्थिक तडजोड आणि पोलिस यंत्रणेवर झालेला प्रभाव, याची जोरदार चर्चा होत आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची पारदर्शक चौकशी व्हावी आणि सत्य जनतेसमोर यावे, यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी तात्काळ लक्ष घालावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. पीडित महिलेला न्याय मिळावा म्हणून तिने केज पोलिस ठाण्यात ९ तास ठाण मांडले, आणि शेवटच्या क्षणी तिला गुन्हा मागे घ्यावा लागला. ही परिस्थिती कोणत्या दबावाखाली तयार झाली? गुन्हा मागे घेण्यासाठी कोणत्या राजकीय मंडळींनी मध्यस्थी केली? पोलीस अधिकारी यामध्ये निष्पक्ष होते का? या सर्व प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठी उच्चस्तरीय चौकशी आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत हे प्रामाणिक आणि सक्षम अधिकारी म्हणून ओळखले जातात. त्यामुळे जनतेला त्यांच्याकडून या प्रकरणात निष्पक्षतेची आणि पारदर्शकतेची अपेक्षा आहे. अन्यथा अशा घटनांमुळे महिलांचा न्याय व्यवस्थेवरचा विश्वास डळमळीत होण्याचा धोका आहे. न्यायासाठी झगडणाऱ्या प्रत्येक महिलेला आधार मिळावा, अन्याय करणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, यासाठी नवनीत कॉवत यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी जनतेची जोरदार मागणी आहे.







### महिलेसोबतचा अन्याय आणि महिला आमदारांचा मौन, संवेदनशील प्रकरणावर कुणीही उघडपणे बोलले नाही?

गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यावर महिलेसोबत छेडछाडीचा गंभीर आरोप झाला, पीडित महिलेला न्यायासाठी पोलिस ठाण्याच्या उंबरठ्यावर नऊ तास बसावे लागले, आणि काही मिनिटांतच राजकीय दबावामुळे गुन्हा मागेही घ्यावा लागला. या सर्व प्रकरणात सर्वाधिक धक्का देणारी बाब म्हणजे कुठलाही राजकीय पुढारी, अगदी स्वत: महिला असलेल्या विद्यमान आमदारांनीही यावर एकही शब्द उच्चारलेला नाही. महिलांच्या सुरक्षेच्या गळा काढणाऱ्या नेत्यांनी प्रत्यक्ष अन्यायाच्या प्रसंगी मौन बाळगल्याचे चित्र जनतेपुढे आले आहे. विशेष म्हणजे या परिसराचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महिला आमदारांनीदेखील या संवेदनशील प्रकरणावर कोणतीही प्रतिक्रिया दिली नाही. एका महिलेसोबत घडलेला अत्याचार आणि त्यानंतरचा मानसिक दबाव, हे अत्यंत गंभीर असून, त्याविरोधात आवाज उठवणे हे सामाजिक आणि राजकीय जबाबदारीचे लक्षण असते. मात्र इथे राजकीय सोयीसुविधा आणि पदाचा मोह मोठा ठरला, आणि अन्याय सहन करणाऱ्या महिलेच्या दु:खाकडे डोळेझाक करण्यात आली. ही केवळ शोकांतिका नव्हे, तर आपल्या लोकशाही व्यवस्थेचेही दुर्दैवच म्हणावे लागेल. आता जनता आणि सामाजिक संघटना या प्रकरणात उघड भूमिका घेण्याची मागणी करत असून, मौन हे संमतीचे लक्षण नसून, कधी कधी दोषाचेही संकेत असते, अशा शब्दांत संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत.

## फरार आरोपीला तब्बल वीस वर्षानंतर जेलबंद केले

### डीबी पथकाची दबंग कारवाई

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहर पोलिसांनी गेल्या वीस वर्षापासून दरोडा टाकून फरार असलेला आरोपी नामे अप्पा महिपती पवार रा सोनपेठ जिल्हा परभणी यास दिनांक १६/०७/२०२५ रोजी सोनपेठ जिल्हा परभणी येथून पाठलाग करून पकडले. थोडक्यात माहिती अशी की सन २००४ मध्ये माजलगाव हद्दीमध्ये शेतातील आखाड्यावर चार ते पाच इस्मानी दरोडा टाकून चोरी केलेली होती.

त्यामध्ये शेतातील शेळ्या तसेच शेतातील माणसांचे पैसे व दाग दागिने ची चोरी करून चोर पसार झाले होते. आज रोजी माजलगाव शहर येथील पोलीस निरीक्षक

▶ पान २ वर



## चकलांबा पोलीस ठाण्याची रेती चोरीविरोधातील धडक कारवाई

बीड । प्रतिनिधी

दिनांक १६/०७/२०२५ रोजी चकलांबा पोलीस स्टेशन हद्दीतील राक्षसभुवन परिसरातील गोदावरी नदी पात्रात ट्रॅक्टरद्वारे बेकायदेशीरपणे रेतीची वाहतूक केली जात असल्याची गोपनीय माहिती पोलीसांना प्राप्त झाली. सदर माहितीच्या आधारे पोलीस स्टेशन चकलांबा येथील सपोनि संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ स्टाफ रवाना करण्यात आला. पोलीस पथकाने नदीपात्रात जाऊन घटनास्थळी छापा टाकला असता, एक ट्रॅक्टर रेतासह आढळून आला. ट्रॅक्टर चालकास घटनास्थळीच ताब्यात घेण्यात आले.

▶ पान २ वर



# केज महावितरण कंपनीचा अजब कारभार!

## प्रिपेड मिटर बसविण्यास मनाई करणाऱ्या ग्राहकांना ३५३ नुसार गुन्हा दाखल करण्याची धमकी

केज प्रतिनिधी

केज शहरात सध्या महावितरण कंपनीचा अजब कारभार सुरू असुन प्रिपेड इलेक्ट्रीक मीटर बसविण्यास मनाई करणाऱ्या ग्राहकांना ३५३ चा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली जात आहे. समाजातील ग्राहकांशी कुठलीही चर्चा न करता हुकूमशाही पद्धतीने मालकांचे जुने इलेक्ट्रिक मीटर बदलून त्या ठिकाणी प्रीपेड ईलेक्ट्रीक मिटर लावून जनतेची हजारो कोटींची लूट करण्याचे महावितरणाचे धोरण आहे.

जनतेची लूट करणाऱ्या महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांमार्फत नागरिकांना न विचारता प्रीपेड इलेक्ट्रॉनिक मीटर गोरगरीब जनतेच्या घरी बसवण्याचे आदेश दिल्यामुळे नागरिक परेशान झालेले आहेत. ग्राहकांना न विचारता हे मीटर बसवण्यात येत आहेत. केज शहरातील अनेक भागात बळजबरीने इलेक्ट्रॉनिक मीटर बसवण्यात आले आहेत. प्रीपेड इलेक्ट्रॉनिक मीटर बसवलेल्या ग्राहकांची रीडिंग पाहता त्यांच्या खिशात काहीच पैसा वाचणार नाही अशा पद्धतीचे प्रीपेड इलेक्ट्रॉनिक मीटर हे मायक्रो सेकंद सारखा पडत आहे. म्हणून सामान्य नागरिकांच्या खिशाला ही न परवडणारी बाब असून समाजातून याविरोधात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

**प्रीपेड इलेक्ट्रिक मीटर म्हणजे सामान्य जनतेची लूट...**

सामान्य नागरिकांना त्रास देण्यासाठी विद्युत महावितरण कंपनीने इलेक्ट्रॉनिक मीटर बसवण्यासाठी सुपारी घेतली की काय? अशीही शंका येत आहे. तसेच हुकूमशाही पद्धतीने नागरिकांना न विचारता हे मिटर नागरिकांच्या घरी बसवत आहेत. प्रीपेड इलेक्ट्रिक मीटर म्हणजे सामान्य जनतेची लूट! प्रीपेड इलेक्ट्रिक मीटर बसवु नयेत, नसता सामान्य नागरिकांसोबत घेऊन आंदोलन करावे लागणार असल्याचे ग्राहकातुन बोलले जात आहे. सामान्य माणसाच्या आयुष्यात अनेक अडचणी असताना प्रीपेड इलेक्ट्रिक मीटर बसण्याची परवानगी हुकूमशाही म्हणून तर नाही ना? अशीच चर्चा नागरिकांतून ऐकु येत आहे. तसेच महावितरण गोरगरिबांवर हुकूमशाही पद्धतीने जोर जबरदस्ती करून हे मीटर बसवत आहे. यामुळे महावितणच्या विरोधात यामुळे नाराजीचा सूर उमटत आहे. केज तालुक्यातील नागरिक आक्रमक होताना दिसत आहेत.

इलेक्ट्रॉनिक मीटर बसवलेल्या नागरिकामध्ये नाराजीचा सुर निघत आहे. दरम्यान रोग म्हशीला आणि इंजेक्शन पखालीला या म्हणीप्रमाणे विजगळती रोखण्यासाठी कर्मचारी यांनी आकडे टाकून विज वापर करणाऱ्या वर कडक कारवाई करावी. चिरीमिरी घेऊन डोळेझाक करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी. अशी मागणी ग्राहक व्यक्त करीत आहेत.



महावितरण प्रीपेडइलेक्ट्रिक मीटर बसवण्याची सुरुवात केली आहे. तसेच

# देवगिरी अर्बन चे सहकार क्षेत्रात उल्लेखनीय काम

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील सहकार क्षेत्रात विश्वासाने घेतले जाणारे नाव म्हणजेच देवगिरी अर्बन. सदरील संस्था मागील ५ वर्षांपासून कार्यरत आहे. संस्था भविष्याचा वेध घेत आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अचूक, जलद, सर्वोत्तम व सुरक्षित बँकिंग सेवा प्रदान करण्यासाठी कटिबद्ध आहे.




आज रोजी संस्थेने २५ कोटी व्यवसायाचा टप्पा पूर्ण केलेला आहे. सहकार क्षेत्रामध्ये केवळ आर्थिक व्यवहारा पुरतेच मर्यादित न राहता सामाजिक जाणीव आपल्या विचारातून आणि कृतीतून जोपासत संस्थेने ६००० हुन अधिक लोकांच्या नेत्र तपासण्या मोफत करून पुढील उपचारासाठी मार्गदर्शन केले तसेच गरजू व असाहाय्य वृद्धांचा ऑपरेशन चा खर्च सुद्धा संस्थेच्या वतीने करण्यात आला. संस्था पुरवत असलेल्या अचूक, जलद, सर्वोत्तम व सुरक्षित बँकिंग सेवेमुळे आज संस्था हजारो सभासदांच्या मनात घर करून आहे.

# सत्यशोधक डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या स्मुर्तीदिनानिमीत्त असंख्य समाज बांधवांनी एकत्र यावे : गालफाडे

केज । प्रतिनिधी

सत्यशोधक डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या स्मुर्तीदिनानिमीत्त सर्व समाज बांधवांनी एकत्र यावे, असे आवाहन केजचे सामाजिक कार्यकर्ते मा.बाबुराव गालफाडे सर यांनी केले आहे.



बहुजन समाज कर्मचारी महासंघ, बिसेफ तसेच बहुजन जेष्ठ नागरिक मंच केजच्या वतीने शुक्रवार दि.१८ जुलै २०२५ रोजी म्हणजे उद्या सकाळी ०९:०० वाजता शासकीय विश्राम ग्रह, केज येथे सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांचा स्मुर्तीदिन साजरा करण्यात येणार आहे. तरी सर्व बहुजन समाज बांधव, कर्मचारी, सेवानिवृत्त, विध्यार्थी, युवा, यांनी वेळेवर उपस्थित रहावे, असे आवाहन डि.के.जाधव नाना, विठ्ठल जाधव सर, मदन जोगदंड सर, दगडू तात्या गालफाडे, लक्ष्मन धनवे सर, सुनीलजी हिरवे, बाबुराव गालफाडे सर, गौतम बचूटे पत्रकार, संतोष गालफाडे पत्रकार, तात्या गवळी पत्रकार, दत्तात्रय मजमुले पत्रकार, अनिल वैरागे पत्रकार, महादेव काळे पत्रकार, वैजेनाथ क्षीरसागर, शहाजी जाधव सर, बाळासाहेब गालफाडे, मनोहर गालफाडे सर, महादेव लांडगे, ईरफान पठाण, विनायक लोंढे, पी.डी.कसबे, जोगदंड सर, बरदापूरकर त्याचप्रमाणे अनेक मातब्बर मान्यवर मंडळी या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित राहणार असून या सर्वांच्या उपस्थितीत होणाऱ्या या कार्यक्रमात असंख्य समाज बांधवांनी उपस्थित राहावे आणि सदरील कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन करण्यात आले आहे.

अण्णाभाऊ साठे यांचा स्मृती दिन म्हणजे त्यांच्या १९६९ मध्ये निधनानंतरचा दिवस – १८ जुलै. हा दिवस समाजहित, साहित्य व संघर्ष या तीन महत्त्वाच्या घटकांचा उत्सव म्हणून साजरा केला जातो. विज्ञान, राजकारण, साहित्य, समाज सर्वच क्षेत्रात त्यांच्या कार्याचा गौरव आणि पुढे चालवण्याचा संदेश या दिवशी दिला जातो.

# श्री. संत गजानन महाराज पालखीचे उद्या गेवराईत आगमन

गेवराई । प्रतिनिधी

आषाढीची वारी परतुन शेगांव कडे जाणाऱ्या श्री संत गजानन महाराज पालखीचे शुक्रवार रोजी सायंकाळी गेवराई आगमन होवुन पालखी



शहरातील कन्या प्रशालेत मुक्कामी थांबणार आहे. तरी पालखी दर्शनाचा लाभ भावीक भक्तांनी घ्यावा असे आवाहन श्री संत गजानन महाराज सेवा समितीच्या वतीने करण्यात आले आहे. विदर्भाची पंढरी असलेल्या शेगांव येथील श्री संत गजानन महाराज यांची पालखी पंढरपूर हुन आषाढी वारी परतुन शेगांव कडे जात असुन हि पालखी गुरूवारचा बीडचा चा मुक्काम करून शुक्रवार रोजी पेंडगाव येथे दुपारचे जेवन करून सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास गेवराई शहरातील जुन्या राष्ट्रीय महामार्गावरून आगमन होणार आहे. हि पालखी शहरातील बाह्य वळण चौक, मोंढा नाका, पंचायत समिती, जुने बसस्थानक मार्गे शहरातील कन्या प्रशालेत येवुन मुक्कामी थांबणार आहे. येथे भावीकांच्या सेवेसाठी कन्या प्रशालेत मुरूम टाकुन साफसफाई तसेच दरवर्षी प्रमाणे दर्शनबारी उभारली आहे. तरी श्रीच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी भावीक भक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन श्री गजानन महाराज सेवा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष श्री.कल्याण (काका) आखाडे व सावता परिषदेचे बीड जिल्हा अध्यक्ष किशोर राऊत यांनी शिवसेना संपर्क कार्यालय केज येथे सदिच्छा भेट दिली. त्यावेळी त्यांचा सत्कार करताना ज्येष्ठ नेते मालोजी (नाना) गलांडे पाटील, दादासाहेब शंकरराव ससाणे शिवसेना विधानसभा प्रमुख केज तथा माजी उपसभापती पंचायत समिती केज नारायण (दादा) शिंदे, माजी पंचायत समिती सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते.



# खालेद फारोकी यांचा धनंजय मुंडे यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व माजी मंत्री धनंजय मुंडे साहेब यांच्या हस्ते समाजसेवक खालेद फारोकी यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करण्यात आले.

यावेळी गेवराई तालुक्याचे आमदार विजयसिंह पंडित मोईन मास्टर सहाब पटनेते फारोक पटेल अमर नाना नाईकवाडे अशपाक इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली धडाडीचे कार्यकर्ते खालेद फारोकी यांनी अजितदादांच्या राष्ट्रवादीत जाहीर प्रवेश केल्यानंतर ठीक ठिकाणी सत्कार करून शुभेच्छा देण्यात आले. शुभेच्छा देताना शाहेद पटेल बरकत पठाण सादेख सर नजर चाचु शकील पठाण शेख इलियास या सह अनेकांनी शुभेच्छा चा वर्षाव केला आहे.

# कर्म करत रहा फळ मिळत राहते : समृद्धी दिवाणे

केज । प्रतिनिधी

दिनांक १५ जुलै २०२५ रोजी साने गुरुजी निवासी विद्यालयात गुणवत्ता विकास वाढ संदर्भाने गटविकास अधिकारी श्रीमती समृद्धी दिवाणे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली केज तालुक्यातील केंद्र प्रमुख व मुख्यमंत्री माजी शाळा सुंदर शाळांचे विस्तार अधिकारी, साधन व्यक्ती यांची बैठक संपन्न झाली. केज तालुक्यातील शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी शिक्षकांनी प्रामाणिकपणे आपले कर्म करावे, कर्म प्रामाणिक असेल तर फळ मिळते. शाळांची गुणवत्ता वाढवण्यासाठी शाळांमधून वेगवेगळे उपक्रम घ्यावेत, शिक्षकाने कृतीशील बनावे. शाळांचा शैक्षणिक दर्जा व भौतिकदर्जा उंचावणे हे आपल्या सर्वांचे काम आहे उपक्रमशील शाळा झपाट्याने पुढे सरकताना दिसत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना उपक्रमशील बनवा. त्याचाच एक भाग सध्या वाचन कुठेतरी थांबलेले आहे. वाचन संस्कृती पुन्हा एकदा जोमाने राबवली पाहिजे. वाचनाची आवड विद्यार्थ्यांमध्ये रुजवण्यासाठी शाळेत अवांतर वाचनाची पुस्तके पुस्तकपेढीच्या माध्यमातून, वाचनालयाच्या माध्यमातून शिक्षकांनी उपलब्ध करून द्यावेत. यासाठी त्यांनी स्वत:पुढाकार घेऊन व स्वत:स्पॉन्सर शिप घेऊन सहा शाळांना अनुराग पुस्तकालय आंबेजोगाई चे साहित्य अभिजीत जोंधळे यांच्या माध्यमातून पुस्तक पेटी भेट देण्यात आली. एका पेटीत पुस्तकांचे ६० ते ७० नग वयानुरूप उपलब्ध आहेत. इतरही शाळांना पुस्तके उपलब्ध करून देण्यात येतील, असे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.



यावेळी साहित्यिक अभिजीत जोंधळे यांनी पुस्तक पेटी हा उपक्रम गेली दहा वर्षापासून ज्या शाळा वाचन संस्कृती रुजवतील अशा शाळांना देत असल्याचे सांगून या पेटीत पहिलीपासून दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना वाचन योग्य अशी पुस्तके असल्याचे मत व्यक्त केले. त्याच बरोबर शिक्षकांना वाचनीय अशी तीन ते चार पुस्तके ही या पेटीत आहेत. आपण मुलं वाचत नाहीत अशी तक्रार करतो, पण मुलांना जर वाचनाला संधी उपलब्ध करून दिली नाही, पुस्तके उपलब्ध करून दिली नाहीत, तर मुले निश्चितच वाचतात. हे कर म्हणणारा कृतिशील शिक्षक असावा लागतो. प्रतिकूलते वर मात करणारी पुस्तके मुलांसमोर ठेवली म्हणजे मुले देखील त्यातून प्रेरित होतात. प्रत्येक माणसाने आपण मोबाईलवर व्यर्थ किती वेळ घालवतो, याचा विचार करावा. त्या ऐवजी फक्त दहा मिनिटात दहा पाने पुस्तकातील वाचून होतील, असाही निर्वाणीचा संदेश त्यांनी यावेळी बोलताना दिला. मुलं अनुकरणप्रिय असतात. मोठी जे करतात तेच मुलं करतात. म्हणून अगोदर मोठ्यांनी वाचायला सुरुवात करावी. म्हणजे मुले आपोआप वाचतील. यावेळी गट शिक्षणाधिकारी लक्ष्मण राव बेडसकर, संस्था अध्यक्ष उद्धवराव कराड सर यांनीही मनोगत व्यक्त केले. सदर बैठकीस ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी दत्ता चाटे, श्री.सुनील केंद्रे सर्व केज तालुक्याचे केंद्रप्रमुख सहा शाळांचे मुख्याध्यापक साधन व्यक्ती उपस्थित होते.

बैठकीचे प्रास्ताविक प्रा.कविता गित्ते मॅडमयांनी केले तर सूत्रसंचालन श्री.चोले सर यांनी केले. आभार प्रदर्शन केंद्र प्रमुख संजय चवरे सर यांनी केले. पुस्तक पेटी दिलेल्या शाळा साने गुरुजी निवासीविद्यालय केज, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिंदी, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा भाटुंबा, माध्यमिक शाळा, मस्साजोग जिल्हा परिषद, प्राथमिक शाळा कळमअंबा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंबेफळ यांना पुस्तक पेटी प्रदान करण्यात आली.

# लोकशाही पत्रकार संघाच्या संगीता सानप यांची निवड अहिल्यानगर अध्यक्षपदी निवड जाहीर

बीड । प्रतिनिधी

लोकशाही पत्रकार महाराष्ट्र राज्य संगीता सानप यांची निवड अध्यक्ष अहिल्यानगर सामाजिक कार्य तसेच बचत गट कार्य संपूर्ण महाराष्ट्र मध्ये आहे. या कार्याची दाखल घेऊन संगीता सानप यांची निवड अहिल्यानगर अध्यक्ष पदी संघांचे, प्रदेश कार्याध्यक्ष अयुब पठाण, संध्या सरोदे प्रदेश कार्याध्यक्ष उद्योग विकास समिती, श्री उमाकांत गव्हाणे चित्रपट दिग्दर्शक, पांडुरंग साळुंखे पुणे जिल्हा अध्यक्ष यांनी संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, प्रदेश अध्यक्ष प्रताप साळुंके, प्रदेश सचिव गणेश जगदाळे, आयेशाखान मुलानी, निलोफर शेख प्रदेश अध्यक्ष महाराष्ट्र, प्रदेश अध्यक्ष उद्योग विकास समिती मनीषा धिरडे, प्रदेश उपाध्यक्ष वसीम आजाद, साजेद सय्यद, अनिस कुरेशी, बीड जिल्हा संघटक यांच्या आदेशानुसार केली.

या यावेळी संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य म्हणाले की, संगीता सानप ह्या ब्युटी पार्लर, टेलरिंग, अशा विविध उद्योग क्षेत्रात तसेच सामाजिक कार्य इतर कलासेस च्या माध्यमातून महिलायांना आपल्या पायावर उभा करीत आहेत. उद्योगाच्या माध्यमातून अनेक महिलांना रोजगार निर्मिती करणार आहे. या त्यांच्या कार्याची दखल घेऊन निवड केली आहे. तसेंच लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य पत्रकारांच्याआणि महाराष्ट्र मधील तमाम सर्व सामान्य नागरिकांचे देखील विविध मागण्या शासन दरबारी मांडून मंजूर करून घेणार आहेत. विविध समित्या स्थापन करून महाराष्ट्र राज्यात तालुक्यात सर्वत्र विकास केला जाईल. विविध कार्यक्रम साजरे केले जातील. एक वेगळा ठसा उमटवण्याचा लोकशाही पत्रकार संघाच्या माध्यमातून प्रयत्न केला जाईल.



नवनिर्वाचित पदाधिकारी संगीता सानप म्हणाल्या की, ही जबाबदारी केवळ सन्मानाची नसून, पत्रकारितेच्या मूल्यांचा व लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचा सन्मान राखत एक प्रामाणिक व प्रभावी कार्यसंस्कृती निर्माण करण्याची संधी आहे, अशी मी भावना बाळगते. आपल्या सर्वांच्या सहकार्याने संघटना अधिक सक्षम, जागरूक व कार्यशील होईल, यासाठी तसेच संघाच्या वाढीसाठी कार्य करण्यासाठी मी कायम आपल्यासोबत असेल त्याच बरोबर महाराष्ट्र मध्ये पत्रकारांची फळी तयारी करून मोठी ताकत निर्माण करून उद्योग क्षेत्रात देखील मोठी क्रांती उद्योग उभारून करू. महिलांना विविध उद्योगाच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिक सक्षम करू, मला खात्री आहे की, शासन सर्व तो परी सहकार्य करील, असेही निवडी प्रसंगी सानप बोलत होत्या.

संगीता सानप यांचा आय कार्ड, निवड पत्र देऊन सत्कार करून संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य, राष्ट्रीय अध्यक्ष माणिक वाघमारे, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, राष्ट्रीय कार्याध्यक्ष मंगला वाघ, राष्ट्रीय निरीक्षक डॉ. भोळे, मुंबई प्रदेश अध्यक्ष मंत्रालय कामकाज दत्तात्रय हंडीबाग, राष्ट्रीय सचिव छाया वैद्य, राष्ट्रीय अध्यक्ष महिला बचत गट, उद्योग विकास समिती सुनंदा केदार, प्रदेश अध्यक्ष मनीषा धिरडे उद्योग विकास समिती, मराठवाडा उपाध्यक्ष दत्ता भाऊ नरनाळे यांच्या मार्गदर्शनानुसार लोकशाही पत्रकार संघ, महाराष्ट्र राज्य, हलिमा शेख प्रदेश उपाध्यक्ष, संध्या सरोदे प्रदेश कार्याध्यक्ष उद्योग विकास समिती मनमोहन तोमर नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष, पांडुरंग साळुंके पुणे जिल्हा अध्यक्ष, प्रदेश उपाध्यक्ष सरपंच ग्रामपंचायत विकास समिती सखाराम पोहीकर, मराठवाडा उपाध्याक्ष बाळासाहेब फपाळ, नांदेड जिल्हा सचिव बाजीराव गायकवाड,शिवराज बिराजदार सोलापूर शहर उपाध्यक्ष, नवी मुंबई सरचिटणीस बालाजी सूर्यवंशी, लक्ष्मण भोसले – सोलापूर शहर सचिव, जस्मित तोमर – नवी मुंबई महिला आघाडी, प्रदेश उपाध्यक्ष संध्या भोसले, प्रदेश उपाध्यक्ष महिला बचत गट उद्योग विकास समिती सारिका शेवाळे, प्रदेश अध्यक्ष महिला अन्याय अत्याचार निर्मूलन विकास समिती श्रद्धा कंडूडे, मराठवाडा युवक अध्यक्ष दिपक भाऊ थोरात, प्रदेश उपाध्यक्ष पोलीस मित्र विकास समिती राणी झिंझुर्डे पाटील, प्रदेश सचिव राणीताई शेख, बीड जिल्हा अध्यक्ष शेख बिलाल, आत्माराम वाव्हाळ यांनी पुढील कार्यास मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत.

पान १ वरून...

### कुठल्याही राजकीय पुढाऱ्यांनी किंवा स्वत: महिला असलेल्या...

जिल्हा परिषदेचे गटशिक्षण अधिकारी म्हणून जरी काम करत असले तरी शिक्षण विभागातील आंदरुणी मोठी जबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली. यातूनच मोठी बोगस शिक्षक भरती करण्यात आली. कोट्यावधींचा भ्रष्टाचार करून हा व्यक्ती थांबला नाही. महिलेची छेडछाड काढण्यापर्यंतचा किळसवाणा प्रकार करून राजकीय दबावाने हे प्रकरण मोडीत काढण्यात आले. तसेच मार्च २०१९ मध्ये एका प्राथमिक महिला शिक्षकाने गटशिक्षण अधिकारी लक्ष्मण बाबुराव बेडसकर यांना कार्यालयात मारहाण केल्याचा प्रकार झाला होता. या प्रकरणात बेडसकर यांनी स्वत: पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. यावरून हे प्रकरण पाहिले नसून यापूर्वीदेखील अशा घटना घडलेल्या आहेत. याला राजकीय पाठबळ असल्यामुळे कुठलाही गुन्हा सहज मोडीत काढू शकतो असे समाज मत बनले आहे.

### फरार आरोपीला तब्बल वीस वर्षानंतर जेलबंद केले

यांना बातमी दारारामार्फत बातमी मिळाली की सदर पुण्यातील आरोपी हा सोनपेठ येथे राहत असून सध्या तो सोनपेठ येथे बाजारामध्ये आलेला आहे त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक साहेब राहुल सूर्य तळ यांनी आपल्या पोलीस स्टेशन येथील उद्द पथकाला सोनपेठ जिल्हा परभणी येथे पाठवून आरोपीस पाठलाग करून ताब्यात घेतले.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कावत बीड अप्पर पोलीस अधीक्षक तिडके मॅडम अंबाजोगाई पोलीस उपअधीक्षक माजलगाव पोलीस निरीक्षक पोस्ट माजलगाव शहर यांचे मार्गदर्शनाखाली पो ह शेख असलम, पो अं अंगद घोडके, पो अं सुनील गवळी पो अं पोकळे, पो अं महेश चव्हाण यांनी सदरची कामगिरी केली.

### चकलांबा पोलीस ठाण्याची रेती चोरीविरोधातील धडक कारवाई

या कारवाईत अंदाजे रुपये ५,६०,०००/– किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, यामध्ये ट्रॅक्टरसह रेतीचा समावेश आहे. याप्रकरणी आरोपी जमीर आरिफ शेख, वय २१ वर्ष, रा. राक्षसभुवन याच्याविरुद्ध संबंधित कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील, पोलीस अंमलदार –ाेळ १३२ वंजारे, झउ २००४ कैलास खटाने, झल २३१ प्रशांत घोंगडे, झल २०६० हनुमान इंगोले यांनी केली आहे.

# स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयात सांडपाणी, अपशिष्ट प्रक्रिया प्रकल्पासाठी ४ कोटींचा निधी मंजूर

## आ. नमिता मुंदडा यांच्या प्रयत्नांना यश, रुग्णालयाच्या पर्यावरण सुधारासाठी महत्त्वाचा निर्णय

अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई येथे सांडपाणी व अपशिष्ट प्रक्रिया प्रकल्प उभारण्यासाठी शासनाकडून ४ कोटी ७ लाख ८३ हजार रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश लाभले असून, त्यांच्या प्रयत्नातूनच हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. परिणाम टळणार आहे. या प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणाऱ्या यंत्रणा आधुनिक असून रुग्णालयातून निर्माण होणारे द्रव अपशिष्ट योग्य पद्धतीने प्रक्रियेनंतर निर्जंतुक करण्यात येईल.




अंबाजोगाईच्या या वैद्यकीय महाविद्यालयात बीड जिल्ह्यासह मराठवाडा परिसरातील रुण मोठ्या प्रमाणावर उपचारासाठी येत असतात. दिवसेंदिवस वाढणाऱ्या रुग्णसंख्येमुळे सांडपाणी व कचऱ्याचे प्रमाणही वाढले आहे. यामुळे पर्यावरण रक्षणासाठी या दोन्ही प्रकल्पांची आवश्यकता होती. या प्रकल्पांमुळे रुग्णालयाचा परिसर अधिक स्वच्छ, आरोग्यदायी आणि पर्यावरणास हितकारक राहणार आहे. लयाच्या दैनंदिन कामकाजात निर्माण होणाऱ्या सांडपाण्यामुळे पर्यावरणावर होत असलेल्या परिणामाचा विचार करता या प्रकल्पाची गरज जाणवली होती. शासनाच्या प्रशासकीय मान्यतेनंतर आता रुग्णालयात सांडपाणी प्रक्रिया केंद्रासह अपशिष्ट व्यवस्थापनासाठी सुसज्ज तंत्रज्ञानाचा प्रकल्प उभारला जाणार आहे. यामुळे रुग्णालयाच्या परिसरातील पर्यावरणावर होणारा विपरीत अतिशय महत्वाचा हा प्रश्न मार्गी लावल्यामुळे आ. नमिता यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, पर्यावरणमंत्री पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.

# शाळा, महाविद्यालय, खाजगी शिकवणी परिसर बनतोय टवाळखोरांचा अड्डा!

आष्टी । प्रतिनिधी

शाळा, महाविद्यालय, खाजगी शिकवणीसाठी शहरात मुलीची संख्खा मोठी आहे. पण याच परिसरात टवाळखोर घिरट्या घालत असल्याने मुलींना नाहक मनस्ताप सहन करण्याची वेळ आली असून पोलिसानी सकाळी शाळा भरण्याच्या वेळेत व सुटण्याच्या वेळेत ठिकठिकाणी थांबण्याची मागणी केली जात आहे.



आष्टी तालुक्यातील आष्टी, अंभोरा पोलीस ठाणे हद्दीत अनेक शाळा महाविद्यालय खाजगी क्लासेस याचा समावेश आहे. त्यातच आष्टी, कडा, येथे महाविद्यालय, खाजगी क्लासेस आहेत तसेच जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत. ग्रामीण भागातून आलेल्या मुलीना येताना, जाताना, रोडरोमिओच्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याने मोठा मनस्ताप मुलीना सहन करण्याची वेळ आली आहे. त्यामुळे पोलिसांनी सकाळच्या वेळेत व सुटण्याच्या दरम्यान चौका चौकात व शाळा, महाविद्यालय परिसरात थांबून रोडरोमिओचा बंदोबस्त करावा अशी मागणी शिवनेरी ग्रूपचे अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकत संदिप खाकाळ यांनी केली आहे.

# विद्यार्थ्यांना मोफत वह्या व शैक्षणिक साहित्य वाटप

गेवराई । प्रतिनिधी

आज दिनांक १६ जुलै २०२५ रोजी समर्थ विद्यालय शिरसमार्ग ता गेवराई जि बीड या शाळेत 'गुरु आनंद महिला प्रतिष्ठान बीड' आयोजित व 'प्रयास फाउंडेशन मुंबई' यांच्या सौजन्याने विद्यार्थ्यांना मोफत वह्या व शैक्षणिक साहित्यवाटप करण्यात आले. गुरु आनंद महिला प्रतिष्ठान बीड या प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ सीमाताई ओस्तवाल यांच्या अथक प्रयत्नातून संपूर्ण बीड जिल्ह्यात मोफत वह्या व शैक्षणिक साहित्य वाटपाचा कार्यक्रम चालू आहे. त्या अनुषंगाने आज समर्थ विद्यालय शिरसमार्ग व जि. प. केंद्रिय प्रथमिक शाळा शिरसमार्ग या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे सचिव सुभाषराव पवळ हे होते. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून बीड जिल्हा संस्थाचालक महासंघ



चे सचिव उत्तमराव पवार, समर्थ विद्यालय शिरसमार्ग चे माजी मुख्याध्यापक श्री मोहनराव पवळ, समर्थ विद्यालय शिरसमार्ग चे मुख्याध्यापक श्री राजेंद्रजी केसभट, जि प केंद्रीय प्राथमिक शाळा शिरसमार्ग चे मुख्याध्यापक श्री साईनाथजी नाईकवाडे व ग्रामीण रुग्णालय शिरसमार्ग चे पवार सर हे उपस्थित होते.

या कार्यक्रमात आयोजक सौ सीमाताई ओस्तवाल यांनी विद्यार्थ्यांना या वह्यांचा सदुपयोग करून आपल्या अभ्यासासाठी वापर करावा व भविष्यात चांगले यश मिळवावे असे प्रतिपादन केले. उत्तमराव पवार यांनी विद्यार्थ्यांना अनमोल असे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी सौ सीमा ताईंचे खूप आभार मानले. कार्यक्रमाच्या शेवटी अध्यक्षीय भाषणात सुभाषराव पवळ यांनी विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण घेऊन उच्च अधिकारी व्हावे असे सांगितले व सीमा ताईंचे आभार मानले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक तांबारे सर यांनी केले व सूत्रसंचालन श्री आहेर सर यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समर्थ विद्यालय व जि प कें. प्रा शाळा शिरसमार्ग या शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले व कार्यक्रम यशस्वी केला.

# आदर्श विद्यालय बीड च्या विद्यार्थ्यांची भरारी

## शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयातील ९ गुणवंत विद्यार्थ्यांनी मारली बाजी

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतिम निकाल तसेच गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर झाली असून यात बीडच्या आदर्श विद्यालयातील तब्बल ९ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीमध्ये स्थान पटका स्थान पटकावून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला.



यामध्ये इयत्ता पाचवी मध्ये अनघा रामप्रसाद शेंडगे, श्रुती परमेश्वर वाघमोडे तसेच इयत्ता आठवी मध्ये वैष्णवी दादासाहेब गोरे, संस्कृती गणेश मिसाळ, कृष्णाली गणेश रीतापुरे, श्रावणी उद्धव करांडे, अमेय शैलेश अकुलवार, गौरव विकास गवते, भक्ती महेंद्र लांडे यांचा शिष्यवृत्ती धारक झाल्याबद्दल शाळेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा पालकासमवेत शाल, पुष्पगुच्छ व आदर्श रत्न ट्रॉफी देऊन सत्कार करण्यात आला.

सदरील कार्यक्रमास उपशिक्षणाधिकारी मोहन काकडे, ज्येष्ठ शिक्षण विस्ताधिकारी श्रीमती प्रणिता गंगाखेडकर उपस्थित होते. सदरील प्रसंगी अनघा शेंडगे व गौरव गवते यांनी आपले मनोगते व्यक्त केली. शिष्यवृत्ती परीक्षा ही भावी सर्व स्पर्धा परीक्षांचा पाया म्हणून ओळखली जाते म्हणून सर्वांनी या परीक्षेचा जिद्दीने, चिकाटीने, मेहनतीने व आत्मविश्वासाने तयारी करावी. त्याचबरोबर संतुलित आहार घेऊन आपले आरोग्य चांगले ठेवावे. मोबाईल आणि टीव्हीपासून दूर राहावे असा मोलाचा सल्ला प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन करताना दिला. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती संध्या वाघमारे मॅडम यांनी केले. या यशाबद्दल ज्ञानेश्वर माऊली शिक्षण प्रसारक मंडळ बीड चे संस्थापक अध्यक्ष अशोक अण्णा जाधव, सचिव सौ सविताताई जाधव, गणेश जाधव, शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता डोके, प्राचार्या दीप्ती देशमुख, शिक्षक वृंद, पालक तसेच मित्र परिवारा कडून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# चौसाळा येथील सार्वजनिक साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ भाऊ साठे जयंतीच्या अध्यक्षपदी सुरज सोनवणे

चौसाळा । प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी चौसाळा येथिल सार्वजनिक लोकशाहीर साहीत्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त बैठक घेऊन सर्वानुमते अध्यक्षपदी सुरज सोनवणे तर उपाध्यक्ष पदी अमोल कांबळे (ग्रामपंचायत मेंबर चौसाळा), सचिव प्रकाश वाघमारे, सहसचिव मिलिंद सोनवणे, कोषाध्यक्ष प्रदीप कुचेकर यांची निवड करण्यात आली तर मार्गदर्शकपदी श्रीमंत सोनवणे, अशोक सोनवणे, विक्रम सोनवणे, पंजाब वाघमारे, विजय सोनवणे, चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक (बाबा) कुचेकर, अजिनाथ सोनवणे, अशोक चोळशे याची निवड करण्यात आली.

सदस्यपदी आकाश सोनवणे, रवी सोनवणे, गोविंद उर्फ बबलू सोनवणे, कुंदन सोनवणे, चंदन सोनवणे, किशोर कुचेकर, किरण कुचेकर, अक्षय कुचेकर, अमोल सोनवणे, प्रथमेश वाघमारे, धनंजय वाघमारे, राहुल सोनवणे, पंकज सोनवणे, दत्ता सोनवणे, परवीन सोनवणे, विशाल सोनवणे, शैलेश वाघमारे, शैलेश सोनवणे, प्रशांत सोनवणे, बबन सोनवणे, बाळू वाघमारे, बाळू सोनवणे, पिंटू सोनवणे, किशोर वाघमारे, मनोज वाघमारे, रमेश सोनवणे, पंजाब सोनवणे, संजय सोनवणे, योगेश कानडे, योगेश सोनवणे, अजय सोनवणे, लखन सोनवणे, प्रीतम कांबळे, अमित कांबळे, किशोर थोरात, शंकर सोनवणे, किशोर सोनवणे, रणजीत सोनवणे, आकाश सोनवणे, सागर सोनवणे, सनी सोनवणे, विकास सोनवणे, सचिन सोनवणे सर, सागर सोनवणे, किरण सोनवणे, विशाल सोनवणे, कैलास सोनवणे, अतिश सोनवणे, लहू सोनवणे, अंकुश सोनवणे, समाधान सोनवणे, वैभव सोनवणे, ओमकार सोनवणे, उमेश केंदळे, अजय इंगोले, कपिल मस्के, प्रवीण सोनवणे, मनोज सोनवणे, अमरदीप सोनवणे, धीरज सोनवणे, योगेश कानडे, समीर कुचेकर, करण कुचेकर यांची एकमताने निवड करण्यात आली.



छत्रपती शाहू महाराज ऑटो रिक्षा युनियनचे सदस्य आमचे मित्र जाधव सरकार आज यांच्या रिक्षामध्ये संजय सोमनाथ राठोड राहणार राजपिंपरी यांचा वीस हजार रुपये किमतीचा मोबाईल राहिला असता गेवराई शहरातील ट्राफिक पोलीस वाले संतोष हांगे त्यांच्या समक्ष तो मोबाईल परत देताना मित्रपरिवार.

# प्रवीण गायकवाड भ्याड हल्ल्याचा निषेधार्थ तहसीलदार यांना सर्वपक्षीयांचे निवेदन




पाटोदा । प्रतिनिधी

अक्कलकोट (जि. सोलापूर) येथे दिनांक १३ जुलै २०२५ रोजी शिव, शाहु, फुले, आंबेडकर अण्णाभाऊ यांच्या विचारांचे पाईक असणारे राज्यस्तरीय नेते प्रवीणदादा गायकवाड यांच्यावर काही समाजकंटकांनी शाही फेकून आणि अन्य हिंसक प्रकारांनी जीवघेणा हल्ला केला. या घटनेच्या निषेधार्थ पाटोदा तहसीलदार यांना काग्रेस, शेकाप शिवसेना (उबाठा) यांनी निवेदन देऊन सरकारने संबंधित आरोपींना कठोर शासन कराण्याची मागणी केली.

शेकापाचे भाई विष्णुपंत घोलप, राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राहुल जाधव, शिवसेना (उबाठा) तालुकाध्यक्ष मुकुंद शिंदे, प्रकाश वीर, निखिल पवने, सुहास मडके, निलेश गांगुर्डे, आकाश कांकरिया, कृष्णा चौरे, बाळासाहेब गायकवाड, तालुकाध्यक्ष (वंचित बहुजन आघाडी) तुकाराम नागरगोजेसह सामाजिक कार्यकर्त्यांनी स्वाक्षऱ्या करून आपला तीव्र निषेध नोंदवला.

# हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतीक सुलेमान बाबा यांचा गुरुवारी ऊर्स



आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील ग्रामदैवत हजरत सुलेमान बाबा यांचा उरूस आज गुरुवार रोजी साजरा होत आहे. सुलेमान बाबा यांचा ऊर्स म्हणजे यात्रा आषाढ महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी असते परंतु लक्ष्मी आईची यात्रा तिसऱ्या मंगळवारी झाल्याशिवाय बाबांची यात्रा होत नाही. म्हणून यंदा चौथ्या गुरुवारी ही यात्रा साजरी होत आहे. ही यात्रा गावातील तसेच बाहेरील सर्व जाती धर्मातील लोकं मोठ्या उत्साहात साजरी करतात.

यावेळी बाहेरूनही भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. सकाळी गावातून मिरवणूक काढली जाते. त्यानंतर डोंगरावर असलेल्या दर्ग्यावर चादर अर्पण केली जाते. त्यानंतर भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात येते. त्यानंतर संध्याकाळी छबीना मिरवणूक काढली जाते. यामध्ये गावातील सर्व जाती धर्मातील लोकं तरुण मोठ्या संख्येने उपस्थित असतात. सामाजिक धार्मिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे सिध्दार्थ भानुदास भादवे यांनी स्वखर्चाने दर्गा परिसरात पत्र्याच्या शेडच काम केले असून त्यांच्या या कार्यामुळे सामाजिक एकतेचा चांगला संदेश गेला आहे.

# प्रविण गायकवाड यांच्यावरील भ्याड हल्ल्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉयर्स सोशल फोरम वतीने जाहिर निषेध

बीड । प्रतिनिधी

संभाजी बिग्रेडचे अध्यक्ष प्रविण गायकवाड यांच्यावर दिनांक १३/०७/२००५ रोजी अकलकोट जि. सोलापूर येते काही गुंडानी व एका राजकीय पक्षाच्या एका पदाधीकाऱ्यांनी केलेला आहे. सदरील हल्ला हा राजकीय द्वेषापोटी व केलेला आहे, हा हल्ला प्रवीण गायकवाड याच्या वरती नसून शाहू, फुले, अंबेडकरी विचार धारे वरती झालेला आहे.



लोकशाही विचारधारेला अडथळा निर्माण करणारा हा हल्ला आहे. सदर घटनेचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल लॉयर्स फोरम, बीडच्या वतीने अध्यक्ष ॲड. राहुल साळवे, ॲड. सिद्धार्थ शिंदे, ॲड. सुरेश वडमारे, ॲड. ओमप्रकाश गायकवाड, ॲड. अजित सोनटक्के, ॲड. धीरज कांबळे, ॲड. भगवान कांडेकर, ॲड. डोके, ॲड. गौतम कांडेकर, ॲड. दिलीप वारे यांनी जाहीर निषेध करून तसे निवेदन जिह्वाधीकारी साहेब याच्या मार्फत मुख्यमंत्री साहेब यांना दिलेला आहे आणि सदर समाज कंटकावर कडक कायदेशीर कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. या निवेदनावर असंख्य वकिलाच्या सह्या आहेत.

# अंबाजोगाईत ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाला सुरूवात

## ग्रंथ दिंडी व संत सावतामाळी पालखी भव्य मिरवणुकीने लक्ष वेधले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्री संत शिरोमणी सावता महाराज संजीवन सोहळ्यानिमित्त अंबाजोगाईत दिनांक १६ ते २२ जुलै दरम्यान ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवारी ग्रंथ दिंडी व संत सावतामाळी पालखी भव्य सवाद्य मिरवणूक, आतिषबाजी, भाविक भक्तांच्या जयघोषात सप्ताहास सुरूवात झाली.

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शहरातील संत सावतामाळी मंदिर, आद्यकवी मुकुंदराज रोड, अंबाजोगाई (जि.बीड.) या ठिकाणी आयोजित श्री संत सावता महाराज महात्म्य कथा, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. अखंड हरिनाम सप्ताहाचा प्रारंभ बुधवार, दिनांक १६ जुलै रोजी सकाळी साडे आठ वाजता जिरे गल्ली येथून ग्रंथ दिंडीने झाला, सवाद्य मिरवणूक, आकर्षक पालखी सजवून, भगव्या पताका खांद्यावर घेऊन, टाळ-मृदंग-वीणा घेऊन



विठोबा- रखुमाई, ज्ञानदेव-तुकाराम नामाचा गजर करीत लहान मुले व मुली विठ्ठल-रखुमाई, विविध संत यांची वेशभूषा करून तर महिला भगिनी यांनी कलश सजवून, तुळशी वृंदावन आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी घेऊन या मिरवणुकीत सहभाग घेतला. यावेळी ज्येष्ठ नागरिक, युवक हिरीरीने सहभागी झाले होते. त्यानंतर सकाळी आकरा वाजता कलश पूजन व टाळ-वीणा-मृदंग पूजन हस्ते ह.भ.प.किसन महाराज पवार, ह.भ.प.गुरूवर्य प्रेममुर्ती अरूण महाराज बर्दापूरकर, ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, कल्याण आखाडे, आनंद शंकरराव शिंदे, ह.भ.प.अरूण महाराज शिनगारे, ह.भ.प.अमोल महाराज घोडके यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी व्यासपीठावर ह.भ.प.महेश महाराज येरोळकर, मृदंगाचार्य ह.भ.प.गणेश आढाव, ह.भ.प.ऋषि महाराज मोरवडकर, ह.भ.प.दिपक महाराज कोरडे, गायनाचार्य ह.भ.प.महेश महाराज येरोळकर, भजनी मंडळ : श्री मुकुंदराज गुरूकुलचे सर्व विद्यार्थी (मुकुंदराज स्वामी मंदिर, अंबाजोगाई) हे होते. यावेळी ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, कल्याण आखाडे, ह.भ.प.अरूण महाराज शिनगारे, ह.भ.प.किसन महाराज पवार यांनी ही आपले समायोचित विचार व्यक्त केले. तर सुत्रसंचालन राम घोडके यांनी केले.

या सप्ताहाची सांगता बुधवार, दि.२३ जुलै रोजी ह.भ.प.गुरूवर्य प्रेममुर्ती अरूण महाराज बर्दापूरकर यांचे काल्याचे किर्तन सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत होवून त्यानंतर महाप्रसाद होईल. सप्ताहाचे आयोजनासाठी संयोजन समितीचे अध्यक्ष अंकुश घोडके, उपाध्यक्ष सुरेश बलुतकर, अनंत अरसुडे, सचिव अर्जुन वाघमारे, सहसचिव भागवत मसने, कोषाध्यक्ष संतोष राऊत, राम घोडके, सदस्य सर्वश्री बळीराम चोपणे, प्रकाश बलुतकर, लक्ष्मण पाथरकर, मधुकर जिरे, नामदेव माळी, दत्तात्रय घोडके, रमेश जिरे, बबन घोडके, दशरथ जिरे, बालासाहेब मसने, अशोक बलुतकर, बालासाहेब माळी, प्रदीप जिरे, विष्णु राऊत, सुभाष चोपणे, डॉ.सुरेश अरसुडे, डॉ.दिपक फुटाणे, बालासाहेब चोपणे, विठ्ठल शिंदे, रमेश घोडके, सिद्राम घोडके, मधुकर घोडके, अशोक जिरे, तुषार करपुडे, बालासाहेब घोडके, संतोष जिरे, गोविंद पाथरकर, पवन जिरे, योगेश डाके, महेश सपाटे, आशिष आढाव, अभिजीत जिरे, शरद माळी, तुकाराम माळी, मंगेश बलुतकर, नितीन जिरे, दिपक गिरे, बबनराव जाधव, पंकज राऊत यांनी तसेच संयोजक, समस्त माळी समाज अंबाजोगाई यांनी पुढाकार घेतला आहे.

## अंबेजोगाई उप प्रादेशिक परिवहन चे सा.मो.वा.नि. वरवटे, अमोल रंगावाड, शेख मुश्ताक, सुरेश भिसे यांची

# सिनेस्टाईल पाठलाग करून हायवा टिप्परवर कारवाई

सिरसाळा । प्रतिनिधी
उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (ठढज) अनधिकृत व क्षमतेपेक्षा जास्त खडी वाहतूक करणाऱ्या हायवा टिप्परवर मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत एका टिप्परला ५३ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.गेल्या काही दिवसांपासून सिरसाळा परिसरात अवैध खडी वाहतुकीचे प्रमाण वाढले होते. अनेक हायवा टिप्पर क्षमतेपेक्षा जास्त खडी घेऊन भरधाव वेगाने धावत होते, ज्यामुळे अपघातांचा धोका वाढला होता. तसेच, शासनाचा महसूलही बुडत होता. या पार्श्वभूमीवर उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी विशेष पथके तयार करून अशा वाहनांवर लक्ष ठेवण्यास सुरुवात केली होती. खडी भरून सुसाट वेगाने सिरसाळ्यावुन सोनपेठ च्या दिशेने जात असल्याचे पाहून उप प्रादेशिक परिवहन चे साहाय्यक मोटार वहान निरीक्षक वरवटे, मोटार वहान निरीक्षक अमोल रंगावाड,सुरेशे अबा भिसे चालक चालक मुश्ताक यांनी सेनेस्टाईल पाठलाग करून हायवा टिप्पर थांबविण्यात आले. टिप्परची तपासणी केली असता, त्यात क्षमतेपेक्षा जास्त खडी भरलेली आढळली. व सिरसाळा पोलिस ठाण्यात आणले तसेच, आवश्यक परवानग्या आणि कागदपत्रेही अपुरी होती.
या गंभीर अनियमिततेमुळे उप प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी तत्काळ दंडात्मक कारवाई केली. टिप्पर मालकाला ५३ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात आला असून, दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे. या कारवाईमुळे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



# बीड डीसीसी बँकेचा मनमानी कारभार

बीड । प्रतिनिधी
बीड पोस्टल को-ऑपरेटिव्ह पतसंस्थेचे व्यवहार मागील अनेक वर्षापासून बीड डीसीसी बँकेमध्ये आहेत. बीड जिल्हा उपनिबंधक साहेबांनी पोस्टल पत पेढी चे अध्यक्ष आणि सचिव यांच्या बडतर्फीचा निर्णय दि.१७.०७.२०२५ रोजी दिला होता. त्या निर्णयाला विभागीय निबंध सहकारी संस्था लातूर यांनी स्थगिती दि.२६.०६.२०२५ दिलेली आहे.




याबाबतचे पत्र सचिव आणि अध्यक्ष यांनी बीड जिल्हा उपनिबंधक साहेब आणि डीसीसी बँकेस सादर केलेले आहे. परंतु जिल्हा उपनिबंधक बीड यांनी आर्थिक व्यवहार बंद करण्याबाबत कसलेही तोंडी अथवा लेखी आदेश बँकेत दिलेले नसता नाही ते डीसीसी बँकेने बीड पोस्टल पतसंस्थेचे आर्थिक व्यवहार कोणाच्या तरी सांगण्यावरून बंद केलेले आहेत. त्यामुळे पतसंस्थेच्या सभासदांचे आर्थिक नुकसान तसेच पतसंस्थे व बीड डीसीसी बँकेचे ही आर्थिक नुकसान झालेले आहे. बीड डीसीसी बँकेचे अधिकाऱ्यांना समक्ष भेटून व्यवहार चालू करण्याची विनंती केलेली होती, तसेच बीड जिल्हा उपनिबंधक साहेबांना ही लेखी निवेदन देऊनही पतसंस्थेचे आर्थिक व्यवहार बँकेने चालू केले नाहीत याची दखल बँकेच्या प्रशासकांनी घेऊन पतसंस्थेच्या सभासदांची आर्थिक, मानसिक आणि शारीरिक पिळवणूक थांबवावी असे आवाहन पोस्टल पतसंस्थेचे अध्यक्ष आणि सचिव यांनी केलेले आहे.
संस्थेच्या सभासदांच्या पाल्यांच्या शिक्षणाच्या कामासाठी लग्नकार्याच्या कामासाठी शेती आणि आरोग्यविषयक कामासाठी पैशाची अत्यंत आवश्यकता असताना बँकेने हे व्यवहार बंद केले आहे ते त्वरित चालू करण्यासाठी प्रशासनाने सहकार्य करावे, असे आवाहन सामान्य सभासद आणि पदाधिकारी यांनी केले आहे.

# आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून गावाचा विकास करणार

## देसुर येथील विविध कामे विकास मार्गी : सरपंच भवर

आष्टी । प्रतिनिधी
सध्या आष्टी पाटोदा शिरूर तालुक्याचे भाग्यविधाते आमदार सुरेश आण्णा धस यांच्या माध्यमातून प्रत्येक गावात विकास कामे चालू आहेत परंतु काही लोक जाणीवपूर्वक राजकारण आणून झालेल्या कामाविषयी विनाकारण उपोषणास बसणे व तक्रार करणे असे प्रकार चालू आहे त्यातलीच एक प्रकार दिसून येतील विकास कामे चालू असतानाही पंचायत समिती कार्यालयासमोर उपोषणास बसणे व काम झाले असताना चालू आहे गावात २१५ घरकुल मंजूर करण्यात आले आहे आहेत २५ सिंचन विहीर अनुदान रस्ते जलजीवन व गावात शुद्ध पाणी मिळावे यासाठी सरपंच बहुवर्यांनी प्रयत्न केले आहेत शाळा अंगणवाडी नवीन इमारत श्रावण बाळाची आधी कामे चांगल्या प्रकारे त्यांनी केली आहेत तरीही कारण नसताना विरोधक मुद्दा धरून उपोषणाला बसतात त्याचबरोबर दलित वस्तीसाठी दहशत लक्ष रुपयाचा निधी आमदार सुरेश आण्णा यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांना आणला आहे आज पर्यंत गोरगरीब दिंनदलित यांच्या सुखदुःखात सतत सामील होतात परंतु काहीतरी मुद्दा घेऊन खोटे आरोप करत उपोषणाला बसण्यावर तक्रार करणे हे प्रकार चालू असल्याने याचा मात्र काहीच फायदा होणार नसला सरपंच भवरे यांनी दैनिक महाराष्ट्र आरंभ यांच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले



# दामिनी पथकाकडून मुलींना आत्मसंरक्षणाचे धडे

बीड । प्रतिनिधी
पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या आदेशाने व मार्गदर्शनाखाली दामिनी पथक प्रमुख झडख पल्लवी जाधव आणि त्यांचे टीमकडून शाळा, कॉलेज मधे भेट देवून मुलींना आत्मसंरक्षणचे धडे देण्यात येत आहे. दामिनी पथक हे मुली, महिला आणि बालकांसाठी काम करते. यामध्ये शाळा, कॉलेज, क्लासेस, वसतिगृह, स्वाधारगृहला भेटी देवून मुलींच्या समस्या जाणून घेणे. मागील आठवड्यात जि.प. शाळा पाली येथे महिला आयोग सदस्य व दामिनी पथकाने सक्षम तू या अभियाना अंतर्गत, मुलींना विविध विषयावर मार्गदर्शन केले होते. तर दिनांक १४/०७/२०२५ रोजी दामिनी पथकाकडून संगमेश्वर विद्यालय नाळवंडी माध्यमिक शाळेतील मुली आणि बालकांना, बालकांचे अधिकार, बाल लैंगिक अत्याचार अधिनियम, गुडटच-बॅडटच, बालविवाह प्रतिबंध कायदा, महिलांना भारतीय संविधानाने दिलेले मुलभूत अधिकार अशा अनेक विषयावर व कायद्याबाबत मार्गदर्शन केले तसेच दैनंदिन वापराच्या वस्तूने आत्मसंरक्षण कसे करायचे याबाबत माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना तत्काळ मदती साठी टोल फ्रि हेल्पलाईन ११२, १०९१, १०९८ वर कॉल करणे तसेच पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून उपलब्ध करुन देण्यात आलेला ठठ कोड वर तक्रार करणेबाबत मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे दामिनी पथक हे शहरात तसेच तालुक्याच्या ठिकाणी जावून बस स्टँड, शाळा, कॉलेजच्या समोर, क्लासेस अशा वर्दळीच्या ठिकाणी गस्त करुन रोडरोमियोवर कारवाई करत आहे. बीड शहर व जिल्ह्यातील महिलांना सार्वजनिक ठिकणी, शाळा, महाविद्यालय परिसरात, कामाच्या ठिकाणी कोणी रोडरोमिओ विनाकारण त्रास देत असेल किंवा छेड काढत असेल तर वर नमुद टोल फ्री क्रमांक किंवा संवाद प्रकल्प ठठ उेवश वर तात्काळ तक्रार करण्याचे आवाहन पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी केले आहे.



# सखी सेंटरमुळे आंध्र प्रदेशातील सखी सुखरूप पोहोचली तिच्या आंध्र प्रदेश येथे घरी

बीड । प्रतिनिधी
आंध्र प्रदेश येथून हरवलेली पिढीचा १३ तारखेला बदनापूर पोलीस स्टेशन तालुका आंबेजोगाई जिल्हा बीड येथे मिळून आली तेथून सदरील पीडिता ओ एस सी बीड येथे रेफर करण्यात आली असता तिच्या आई-वडिलांचा शोध घेऊन पोलिसांच्या मदतीने दिनांक १५.७.२०२५ रोजी पोलिसांच्या समक्ष तिला तिच्या आई-वडिलांसोबत आंध्र प्रदेश येथे पाठवण्यामध्ये बीड येथील महिलांच्या संदर्भामध्ये अतिशय उत्कृष्ट कार्य बनवणाऱ्या सखी सेंटर च्या टीमला यश आले.
त्यांच्या या यशाचे आंध्र प्रदेश सह मराठवाड्यासह महाराष्ट्रातून या उत्कृष्ट कर्तव्याच्या बाबतीत सर्व नागरिकांमधून समाधान व्यक्त हे काम पूर्ण करण्याकरता सर्व सखी सेंटर येथील टीमने अतिशय चांगले प्रयत्न केले तसेच पोलिसांचेही मोठे योगदान या कामांमध्ये आहे हे काम करणारे एस.एम. राठोड पोलीस हेड कॉन्स्टेबल तेसच जी.बी. फड पोलीस हेडकॉन्स्टेबल एस.ए. सिरसाठ म पो ह. तसेच बीड येथील सखी केंद्राच्या केंद्र प्रशासक म्हणून उत्कृष्ट महिलांच्या बाबतीत कर्तव्य बजावणाऱ्या शांता खांडेकर मॅडम व सखी केंद्रातील सर्व टीम या सर्वांच्या सहकार्यामुळे व मदतीमुळे आंध्र प्रदेशातील सखी तिच्या घरी सुखरूप पोहोचू शकली म्हणून आंबेजोगाई पोलिसांचे व बीड येथील सखी केंद्राचे सर्वत्र त्यांच्या कर्तव्याबाबतीत सर्व नागरिकांमधून समाधान व्यक्त होत असून त्यांच्या या यशाचे व कार्याचे कौतुक केले जात आहे.



# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका काँग्रेस पक्ष सर्वांना सोबत घेऊन लढवणार

## इच्छुकांनी संपर्क साधावा; तालुकाध्यक्ष ॲड.प्रकाश मुंडे यांचे आवाहन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी
आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्ष सर्वांना सोबत घेऊन मैदानात उतरणार असून, पक्षातील सर्व जुन्या आणि नव्या कार्यकर्त्यांना सोबत घेतले जाणार आहे. त्याचबरोबर नव्याने पक्षबांधणी सुरू असून, इच्छुकांनी आमच्याशी संपर्क साधावा असे आवाहन काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष ॲड.प्रकाश मुंडे यांनी केले आहे.
अखिल भारतीय काँग्रेस कार्यसमितीच्या सदस्या तथा हिमाचल प्रदेश प्रभारी खासदार सौ. रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकरावजी पाटील, बीड जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, अखिल भारतीय राष्ट्रीय किसान समन्वयक बाबुराव मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ तालुक्यातील प्रत्येक जिल्हा परिषद सर्कल, पंचायत समिती गण तसेच गावागावात काँग्रेस पक्षाची बांधणी करण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. पक्षातील सर्व जुन्या आणि नव्या कार्यकर्त्यांना तर संधी मिळेलच परंतु नव्याने पक्षात येऊ इच्छित असलेल्या सर्वांना समान न्यायाने संधी दिली जाईल. त्यामुळे पक्ष संघटनेत काम करण्याची इच्छा असेल किंवा आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत उमेदवार म्हणून भाग घेण्याची इच्छा असेल अशा कार्यकर्त्यांनी आमच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष ॲड.प्रकाश मुंडे यांनी केले आहे.



# आरोग्य व पर्यावरण सेवा सप्ताहास केजमध्ये उत्स्फुर्त प्रतिसाद!

केज । प्रतिनिधी
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या २२ जुलै रोजी येणाऱ्या वाढदिवसाचे औचित्य साधून तसेच माजीमंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या १५ जुलै रोजीच्या वाढदिवसानिमित्त नगर पंचायत केज, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी केज शहर यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य जनहित व पर्यावरण सेवा सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या सेवा सप्ताहाच्या दुसऱ्या दिवशी केज शहरात महिलांसाठी मोफत रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमास केजच्या नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे उद्घाटन केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या हस्ते केजच्या नगर पंचायत कार्यालयात सकाळी ११ वाजता संपन्न झाले.
केज शहरातील महिलांनी मोठ्यासंख्येने सहभाग नोंदवला व आपल्या आरोग्याच्या तपासण्या करून घेतल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव जोगदंड यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन श्री.नागरगोजे यांनी केले. या कार्यक्रमास कनिष्ठ अभियंता शीतल सय्यद (महावितरण), सामाजिक कार्यकर्त्या मनीषा घुले, नगरसेवक राजू इनामदार, सतीश डांगे, अशोक गायकवाड, लखन हजारे, फेरोज शेख, मनोज मस्के तसेच पत्रकार मुब्बशीर खतीब यांच्यासह केज शहरातील महिला मोठ्या संख्येनेउपस्थित होत्या.



# बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी पोथरा येथे चालवून पाहिले कोळपणी यंत्र

बीड । प्रतिनिधी
बीड तालुक्यात नेकनूर मंडळात केजच्या हद्दीला लागून पोथरा हे गाव आहे. या गावी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, नेकनूरचे मंडळ अधिकारी पंडित नाईकवाडे, पोथऱ्याचे तलाठी अक्षय चव्हाण, तलाठी सर्वेश कांबळे, तलाठी प्रशांत नलावडे यांनी भेट दिली. यावेळी मधुकर साहेबराव दराडे, सुरेश हावळे उपस्थित होते. शेतकरी कोळपणी करत असल्याचे बघून तहसीलदार थांबले. मलाही कोळपणी करण्याचा अनुभव घेऊ द्या, असे त्यांनी बोलून दाखविले. त्या ठिकाणी कोळपणी करण्याची पद्धत समजून घेतली. स्वतः कोळपणी करण्याचा अनुभव घेतला. शेतकरी दराडे यांच्याशी गप्पा मारताना त्यांनी माहिती घेतली. यावेळी दराडे यांनी माहिती दिली की त्यांच्या शेतात बहुतांश वेळा सोयाबीन हेच पीक घेतल्या जाते. जमीन सुपीक असली तरी बारमाही पाण्याची व्यवस्था नसल्याने त्यांना खरिपात हेच पीक परवडते. यापूर्वी ते कपाशीचे पीक घेत असत. तथापि कपाशीच्या पिकावर असणाऱ्या रोगराई, त्यास लागणारा खर्च इत्यादी विचारात घेता त्यांना सोयाबीन पीक हे परवडत आहे.



शासनाच्या शेतकऱ्यांसाठी अनेक योजना असतात. कृषी विभाग, महसूल विभागामार्फत या योजनांची अंमलबजावणी होत असते. शेतकऱ्यांचे काय प्रश्न आहेत याबद्दलची माहिती प्रत्यक्ष भेटी दिल्याशिवाय कळत नाही. त्या अनुषंगाने तहसीलदारांची प्रत्यक्ष शेतावर भेट महत्त्वाची ठरते. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे प्रत्येक तालुक्यास भेट देऊन सर्वसामान्य जनता, नागरिक यांचे प्रश्न समजावून घेत आहेत. बीडचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी आल्यापासून अनेक उपक्रम राबविण्यास सुरुवात केलेली आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी असल्यास ते व्यवस्थितरित्या समजून सांगतात. संबंधित उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्याशी सरळ संपर्क साधून नागरिकांची कामे सोप्या पद्धतीने कशी होतील याची दक्षता बाळगतात.
बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव या शेतकऱ्यांप्रती अत्यंत कनवाळू आहेत. सर्वसामान्य शेतकऱ्यांची कामे लवकर झाली पाहिजे, फेरफार लवकर झाले पाहिजे, फार्मर आयडी लवकर निघाले पाहिजे यासाठी त्या वेळोवेळी बीड, गेवराई, शिरूर कासारचे तहसीलदार, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी यांचा पाठपुरावा करत असतात. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शेतकऱ्यांसाठी अनेक महत्त्वाच्या योजना सुरू केल्या आहेत. विशेषता बारा फुटाचा रस्ता, सातबारा वरील अनावश्यक नोंदी कमी करण्यासाठी जिवंत सातबारा मोहीम राबविणे इत्यादी अनेक शेतकरी हिताचे निर्णय त्यांनी घेतले आहेत. त्यांचे निर्णय स्थानिक पातळी पर्यंत पोहोचले किंवा नाही याची खात्री करण्यासाठी तहसीलदार चंद्रकांत शेळके झटत असल्याचे दिसून येते.
बीड तालुक्यातील पीक पेरणीचा विचार केला असता बाजरी ९८५६ हेक्टरवर, मका २१५४ हेक्टर, तूर ५४०८ हेक्टर, मूग ३२४५ हेक्टर, उडीद ३४१५ हेक्टर, भुईमूग ४० हेक्टर, तीळ १५ हेक्टर, सोयाबीन ४६,२४१ हेक्टरवर, कापूस ५१,८२४ हेक्टरवर अशाप्रकारे १,२२,२५३ हेक्टरवर पेरणी झाल्याचे दिसते. बीड जिल्ह्यात एकूण ११ तालुके आहेत. या सर्व तालुक्यांचा विचार केला असता सरासरी ८७% हेक्टरवर खरिपाची पेरणी झाल्याचे समजते. यावर्षी मे महिन्याच्या शेवटी शेवटी चांगल्या प्रकारे पाऊस झाला असला तरी जून महिन्यातील पाऊसमान हे सलग दिसत नाही. अधून मधून पावसाच्या सरी येतात. त्यामुळे पिके तग धरून आहेत. तथापि मोठ्या पावसाची प्रतीक्षा दिसून येते.
आजच्या तहसीलदारांच्या भेटीमुळे पोथरा येथील शेतकरी आनंदी झाल्याचे दिसून आले. माझ्या शेतात तहसीलदार यांनी स्वतः येऊन कोळपणी केली हे माझे भाग्य आहे, असे दराडे यांनी नमूद केले. बीड जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी तहसीलदार शेळके यांच्याप्रमाणे क्षेत्रिय भेटी दिल्या, शेतकऱ्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या तर निश्चितच प्रशासनाबद्दलची नागरिकांची भावना सकारात्मक होईल यात शंका नाही.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT